**पंतप्रधानांनी घेतली इस्रायलच्या पंतप्रधानांची भेट (26 फेब्रुवारी 2026)**

26 फेब्रुवारी 2026

आपल्या इस्रायलच्या अधिकृत भेटीदरम्यान, पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांची 26 फेब्रुवारी 2026 रोजी जेरुसलेममध्ये इस्रायलचे पंतप्रधान श्री. बेंजामिन नेतन्याहू यांच्यासोबत औपचारिक चर्चा झाली.

2. दोन्ही पंतप्रधानांनी भारत-इस्रायल भागीदारीच्या सर्व पैलूंवर सखोल चर्चा करण्यात आली. या चर्चेत, दोन्ही देशांमधील दृढ विश्वास आणि मैत्रीचे प्रतिबिंब म्हणून, द्विपक्षीय संबंधांना "शांती, नवोपक्रम व समृद्धीसाठी विशेष धोरणात्मक भागीदारी" पर्यंत नेण्याचा निर्णय घेण्यात आला. हा निर्णय दोन्ही देशांच्या सुरक्षित व समृद्ध भविष्याप्रति समान दृष्टीकोनाचा व वाढता हितसंबंधाचा प्रतीक आहे.

3. दोन्ही नेत्यांनी सर्व क्षेत्रातील द्विपक्षीय सहकार्याच्या प्रगतीबाबत समाधान व्यक्त केले आणि व्यापार व गुंतवणूक, संरक्षण व सुरक्षा, अंतराळ, ऊर्जा, अत्यावश्यक तंत्रज्ञान, सायबर सुरक्षा, शिक्षण, वैज्ञानिक संशोधन व नवोपक्रम या क्षेत्रातील सहकार्याचा अधिक विस्तार करण्यावर सहमती दर्शवली. त्यांनी कृषी, जल व्यवस्थापन, स्टार्ट-अप, फिनटेक, डिजिटल आरोग्यसेवा, जैवतंत्रज्ञान आणि प्रगत फार्मा क्षेत्रात भारत-इस्रायल भागीदारीच्या परिवर्तनशील क्षमतेवरही भर दिला. दोन्ही नेत्यांनी लोकांमधील परस्पर संबंधांना चालना देण्यासाठी गमनशीलता भागीदारी वाढवण्याच्या नवीन उपक्रमांचे स्वागत केले. प्रस्तावित मुक्त व्यापार करार लवकर पूर्ण करण्याची गरज व्यक्त करत, त्यांनी नमूद केले की द्विपक्षीय गुंतवणूक करार, भारत-इस्रायल इनोव्हेशन ब्रिज, भारत-इस्रायल इनोव्हेशन सेंटर फॉर अग्रीकल्चर आणि भारत-इस्रायल औद्योगिक औद्योगिक संशोधन व विकास आणि नवप्रवर्तन निधी, यांमुळे दोन्ही देशांमधील आर्थिक, उद्योजक व वैज्ञानिक सहकार्यात लक्षणीय वाढ होईल. त्यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), अर्धवाहक, क्वांटम व इतर अत्याधुनिक तंत्रज्ञान क्षेत्रात अधिक सहकार्य करण्याचीही गरज व्यक्त केली, ज्यामुळे भारताचे प्रतिभावंत मनुष्यबळ व इस्रायलची नवोपक्रम क्षमता यांचा समन्वय साधता येईल.

4. दोन्ही नेत्यांची परस्पर हितसंबंधाच्या प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवरही चर्चा झाली. पंतप्रधानांनी गाझा शांती योजनेला आपला पाठिंबा व्यक्त केला आणि या पुढाकारामुळे प्रदेशात शांती व स्थैर्य प्रस्थापित होईल, अशी आशा व्यक्त केली. दोन्ही नेत्यांनी आयएमईसी आणि I2U2 उपक्रमांमध्ये दोन देशांमधील सहकार्य अधिक दृढ करण्यावर भर दिला. दहशतवादाविरूद्ध जागतिक लढ्यात आपले दृढ संकल्पही त्यांनी व्यक्त केले. इस्रायलने भारताच्या दहशतवादाविरुद्धच्या लढ्यात दिलेल्या पाठिंब्याबद्दल पंतप्रधानांनी नेतन्याहू यांचे आभार मानले.

5. चर्चेनंतर अनेक करार व सामंजस्य करार करण्यात आले  [Link]. या अधिकृत भेटीदरम्यान द्विपक्षीय भागीदारीसाठी भविष्यातील कृती आराखड्याची रूपरेषा आखण्याबाबतचे संयुक्त निवेदन स्वीकारण्यात आले [Link].

6. पंतप्रधान नेतन्याहू यांच्या स्नेहमय आदरातिथ्याबद्दल पंतप्रधानांनी त्यांचे आभार मानले.

जेरुसलेम

26 फेब्रुवारी 2026